THANE POLICE COMMISSIONERATE

# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर

## P.R.O. OFFICE, DCP ZONE-1, THANE CITY

Address- Office of Dy.Commissioner of Police, Zone-1, Thane,
Jail Road Thane, Near Old R.T.O.Office, Opp. Central Ground, Thane (w) Maharashtra 400601
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +919819028279

प्रेसनोट / /२०२४ दिनांक – ०७/१०/२०२४

## कळवा पोलीस स्टेशनची उल्लेखनिय कामगिरी

### “ खुनाच्या गंभीर स्वरूपाच्या गुन्हयात कोणताही पुरावा नसताना आरोपीस अटक करून गुन्हा उघडकीस आणलेबाबत”

फिर्यादी श्री. उमेशकुमार इंद्रजित प्रजापती, वय–५३ वर्षे, धंदा–व्यवसाय, रा. रू.नं. ६९८६, भगवान बुध्द् चाळ, भास्करनगर, कळवा पुर्व, जि. ठाणे यांनी त्यांचा मुलगा राहुल उमेशकुमार प्रजापती, वय–२७ वर्षे, यास कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून दि.०१/१०/२०२४ रोजी २३.१५ वा. ते दि.०२/१०/२०२४ रोजी ०९.५० वा. च्या पुर्वी डोंगराच्या पायथ्या जवळ, नवजिवन चाळ, गल्ली नं. ०६, भास्करनगर, कळवा पुर्व येथे जिवे ठार मारले म्हणुन दिलेल्या तक्रारीवरून दि. ०२/१०/२०२४ रोजी १२.३१ वा. गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयाचे गांभीर्य ओळखुन मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनाप्रमाणे व.पो.निरी.अशोक उतेकर यांनी सपोनिरी. दत्तात्रय यादव, पोउपनिरी.सागर सांगवे, गुंडा विरोधी पथक व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस अंमलदार यांना घटनास्थळ, कळवा पुर्व व इतर परिसरात आरोपीत याचा शोध घेणेकामी रवाना केलेले होते. त्या दरम्यान नमुद स्टाफ गुन्हयाचा तपास करीत असताना त्यांना साक्षीदार यांच्याकडुन माहिती मिळाली की, “ त्यांनी दि. १/१०/२०२४ रोजी रात्रौ ११.३० वा मयत इसम राहुल उमेशकुमार प्रजापती यास पारसिक बोगदा येथे पाहीले होते” त्यानुसार सदर पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी कळवा पुर्व परिसरात असलेल्या सर्व सी.सी.टी.व्ही.कॅमेऱ्यांची पाहणी केली. त्यामध्ये गुन्हयातील मयत हा घटनेच्या काही वेळेपुर्वी एका इसमा सोबत गेल्याचे दिसुन आले. त्यावरून त्याचे वर्णन, इतर माहिती व गुप्त बातमीदार यांच्या मदतीने त्याचा कळवा पुर्व परिसरात शोध घेवुन त्यास ताब्यात घेतले असता त्याने त्याचे नाव, पत्ता रमेश उर्फ बाला श्यामलाल माळी वय २८ वर्षे रा. राधाकृष्ण चाळ, भास्करनगर, कळवा पुर्व, ठाणे असे असल्याचे सांगितले. त्यावर त्यास पोलीस ठाण्यात चौकशीकामी आणले. त्याच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने विचारपुस केली असता त्याने वेळोवेळी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे त्यास अधिक विश्वासत घेवुन त्याच्याकडे बारकाईने कौशल्यपुर्वक विचारपुस केली असता त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यामध्ये त्याने त्याच्यामध्ये व मयत याच्यामध्ये काही दिवसापुर्वी वादावादी झाल्याने त्याच्या रागातुन त्यास ठोशाबुक्यांनी मारहाण करून गळयावर गुडघा ठेवुन हाताने नाक, तोंड दाबुन त्यास जिवे ठार मारल्याचे सांगुन सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली दिली. त्यामुळे सदर गुन्हयातील आरोपीत याच्याबाबत कोणतीही ठोस माहिती उपलब्ध नसताना सी.सी.टी.व्ही.कॅमेरे व गुप्त बातमीदार यांच्याकडुन मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने नमुद आरोपीत याचा शोध घेवुन त्यास गुन्हयात अटक करून सदरचा गंभीर स्वरूपाचा गुन्हा उघडकीस आणुन उल्लखेनिय कामगिरी केलेली आहे.

सदरची कामगिरी मा.श्री.आशुतोष डुंबरे सो, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, मा.श्री.ज्ञानेश्वर चव्हाण सो, पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर, मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. विनायक देशमुख सो, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे, मा. पोलीस उप आयुक्त, परि.–०१, श्री.सुभाषचंद्र बुरसे सो, ठाणे, मा. सहायक पोलीस आयुक्त, श्री.उत्तम कोळेकर सो, कळवा विभाग, ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांनी दिलेल्या सुचनाप्रमाणे करण्यात आलेली आहे.

सदर उल्लेखनिय कामगिरीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.अशोक उतेकर, कळवा पोलीस स्टेशन यांनी पोलीस निरीक्षक, गुन्हे, अनिल गायकवाड, स.पो.निरी.दत्तात्रय यादव, सपोनिरी.ज्ञानेश्वर धोंडे, सपोनिरी. विनायक करडे, पो.उप.निरी.सागर सांगवे, पो.हवा./४१७४ संदिप महाडिक, पोहवा/४४४६ शहाजी ऐडके, पोहवा/६६१४ राहुल पवार, पोहवा/२३५१ तानाजी साळोखे, पोहवा/६६७५ श्रीमंत राठोड, पोहवा/६९६९ गणेश बांडे, पोहवा/६१०८ अनिल खुस्पे, पोहवा/३१४६ भास्कर विरकर, पोहवा/३७९३ रमेश पाटील, पोहवा/११२७ संतोष कुमावत, पोना/७२६१ समाधान माळी (तात्रीक माहिती), पोकॉ/२७५५ अमोल ढावरे, पोकॉ/४४११ नामदेव कोळी, पोकॉ/८०६६ प्रशांत लवटे यांना दिलेल्या सुचना व मार्गदर्शना प्रमाणे गुन्हयातील आरोपीबाबत काहीएक ठोस माहिती नसताना सदरचा गंभीर स्वरूपाचा खुनाचा गुन्हा कौशल्यपुर्वक उघडकीस आणुन उल्लेखनिय कामगिरी केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास व.पो.निरी.अशोक उतेकर हे करीत असुन गुन्हयाचा तपास चालु आहे.

––––––०००––––––